

# हिंदूसूर्य महाराणा प्रताप

सविस्तर वृत्त पान २ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–35 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, ४ मे 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

## बहुजन विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध : मंत्री अतुल सावे

### 'वनार्टी'च्या अधिकृत संकेतस्थळ व माहिती पत्रकाचे थाटात प्रकाशन

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

बहुजन समाजातील वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्य आणि स्वावलंबनाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संधींचे नवे दालन उघडले जात आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात डिजिटल साधनांचा योग्य वापर करणारा, ज्ञान आत्मसात करणारा आणि आत्मविश्वासाने पुढे जाणारा विद्यार्थीच यशस्वी ठरतो. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी डिजिटल माध्यमे अत्यंत प्रभावी ठरत आहेत, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा 'वनार्टी'चे अध्यक्ष मा. अतुल सावे यांनी केले.

नांदेड येथील शंकरराव चव्हाण सभागृहात इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे आयोजित 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळावा' या कार्यक्रमात वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर यांच्या अधिकृत संकेतस्थळ डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. वनार्टी. इन (www. vanarti.in) व माहिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. अतुल सावे होते. या प्रसंगी माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. राजेश पवार, आ. बाबुराव कोहळीकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे, इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. वसंत माने, 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे तसेच वसंतराव नाईक विकास महामंडळाचे संचालक प्रताप पवार आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना मा. अतुल सावे म्हणाले की, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था ही विमुक्त जाती (व्हिजे-ए) तसेच भटक्या जमाती ब, क व ड (एनटी-बी, एनटी-सी व एनटी-डी) नॉन क्रिमीलेअर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी संधी निर्माण करणारे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, अर्थसहाय्य, कौशल्य विकास, अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश मार्गदर्शन तसेच उद्योजकता विकास अशा विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असल्याचे मा. अतुल सावे यांनी सांगितले.



**एका क्लिकवर योजना, मार्गदर्शन आणि करिअरच्या संधी : मा. प्रशांत वावगे**

'वनार्टी'च्या नव्या संकेतस्थळ व माहिती पत्रकामुळे विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना, अर्ज प्रक्रिया, प्रशिक्षण व करिअर मार्गदर्शनाची सविस्तर माहिती आता एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे, असे 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक मा. प्रशांत वावगे यांनी सांगितले. राज्यातील हजारो विद्यार्थी यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आदी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत असून, या डिजिटल माध्यमामुळे त्यांच्या तयारीला अधिक गती मिळणार आहे. संकेतस्थळावरील क्यूआर कोड स्कॅन करून विद्यार्थी प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींपर्यंत सहज पोहोचू शकतात. 'वनार्टी' ही संस्था विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारा दीपस्तंभ ठरत असून, या नव्या डिजिटल व्यासपीठामुळे त्यांच्या स्वप्नांना ठोस दिशा मिळणार असल्याचा विश्वासही मा. प्रशांत वावगे यांनी व्यक्त केला.

## लातूरमध्ये माणुसकीला काळिमा!

### नराधम पित्याचे स्वत:च्याच गतिमंद मुलीवर अत्याचार; गर्भवती राहिल्याने प्रकरण उघडकीस

**लातूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रात संतापजनक घटनांची मालिका सुरू असतानाच, लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातून माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत अमानवी घटना समोर आली आहे. येथे एका जन्मदात्या पित्यानेच आपल्या अल्पवयीन गतिमंद मुलीवर वारंवार अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, या कृत्यामुळे पितृत्वाच्या पवित्र नात्याला डाग लागला आहे. नसरापूर आणि बीडमधील घटनांनंतर हा घृणास्पद प्रकार समोर आल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणात पीडित मुलीच्या आईने १७ एप्रिल रोजी जळकोट पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार दाखल केली होती. मात्र पीडित मुलगी सुमारे १९ आठवडे २ दिवसांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाल्याने प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले. जळकोट पोलिसांनी सखोल तपास करत संशयावरून मुलीच्या वडिलांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, स्वतः जन्मदात्या पित्यानेच हे घृणास्पद कृत्य केल्याची कबुली दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

याप्रकरणी जळकोट पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील विविध कलमे आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (POCSO) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी पित्याला तातडीने अटक केली असून, या घटनेचा सखोल तपास पोलिस अधिकाऱ्यांमार्फत केला जात आहे.

**पुण्यातील धक्कादायक प्रकरण–** पुण्याच्या नसरापूर परिसरात १ मे रोजी माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत भीषण घटना घडली असून, येथे एका ६५ वर्षीय नराधमाने घरासमोर खेळणाऱ्या चिमुरडीला गोठ्यात नेऊन तिच्यावर अत्याचार केले आणि त्यानंतर तिची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केली.

या नराधमाने कृत्यानंतर तिचा मृतदेह गोठ्यातील शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवला होता. मात्र मुलगी बेपत्ता झाल्याने सुरू केलेल्या शोधमोहिमेत तिचा मृतदेह आढळून आला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, संबंधित आरोपी चिमुरडीला गोठ्याकडे घेऊन जाताना स्पष्टपणे दिसून आल्याने हा क्रूर प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी आता एसआयटी स्थापन करण्यात आली असून तपास सुरू करण्यात आला आहे.

## इम्तियाज यांच्यासह तिघांवर अदखलपात्र गुन्हा दाखल : कचरा हस्तांतरण केंद्रावरील काम रोखणे भोवले

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

एन-१२ भागातील कचरा हस्तांतरण केंद्रावर काम थांबवल्याच्या कारणावरून एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील, मनपाचे विरोधी पक्षनेते अब्दुल समीर अब्दुल साजीद आणि नगरसेवक काकासाहेब काकडे यांच्याविरुद्ध सिटी चौक ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

मनपा मार्फत कचरा संकलन व वाहतुकीचे काम करणाऱ्या वेस्टर्न इमर्जनरी कंपनीचे कंत्राटी कर्मचारी विशाल विलासराव कांबळे यांनी याबाबत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, एन-१२ येथील कचरा हस्तांतरण केंद्रावर २ मे रोजी दिवसभर कामकाज सुरळीत सुरू होते. दुपारी ४ वाजता मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी या केंद्राची पाहणी केली. मात्र, सायंकाळी ६.५१ वाजेच्या सुमारास माजी खासदार इम्तियाज जलील, समीर बिल्डर आणि काकासाहेब काकडे यांनी केंद्रावर येऊन येथे कोणतेही काम झाले नाही पाहिजे, असे सांगत काम थांबवले. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करण्यात आली. यामुळे कर्मचारी घाबरून गेले. तसेच कर्मचारी हार्दिक पांचाळ यांचा मोबाइल हिसकावून फेकून दिला आणि सुरक्षा रक्षकांनाही धमकावल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## वेरूळ लेणीत मधमाशांचा पर्यटकांवर हल्ला:५० ते १०० जण किरकोळ जखमी, पर्यटकांना बाहेर काढताना मोठी तारांबळ; दोन तास लेणी बंद

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जागतिक वारसा स्थळ असलेल्या व जगप्रसिद्ध वेरूळ लेणी परिसरात दिनांक ३ मे रोजी रविवारी सकाळी मधमाशांनी पर्यटकांवर अचानक हल्ला केल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेत ५० ते १०० पर्यटकांना किरकोळ डंख लागले असून सुदैवाने कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही.

रविवार असल्याने वेरूळ लेणी पाहण्यासाठी पर्यटकांनी गर्दी केली होती. सकाळी १० ते ११ च्या सुमारास लेणी क्रमांक १० व १६ पाहण्यासाठी पर्यटक पोहोचले असता, त्याचवेळी मधमाशांच्या थव्याने अचानक हल्ला चढवला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे पर्यटकांमध्ये घबराट पसरली. लहान मुले व वृद्ध पर्यटकांना बाहेर काढताना मोठी तारांबळ उडाली. स्थानिक गाईड, हॉकर्स व लेणी सुरक्षा रक्षकांनी तातडीने मदत करत सर्व पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी बाहेर काढले.

मधमाशांच्या या हल्ल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय पुरातत्व विभागाने वेरूळ लेणी पर्यटकांसाठी सुमारे दोन तास बंद ठेवल्या. परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर लेणी पुन्हा सुरू करण्यात आली.

### पर्यटकांनी घ्यावयाची काळजी

- गडद रंगाचे कपडे घालू नका मधमाशा गडद रंगाकडे अधिक आकर्षित होतात.
- परफ्यूम, सुगंधित द्रव्ये टाळा सुगंधामुळे मधमाशा आक्रमक होतात.
- मोठा आवाज करणे, मोहळाजवळ जाणे टाळा यामुळे त्या चिडतात.
- हल्ला झाल्यास जमिनीवर झोपून डोके-चेहरा झाकून घ्या स्वतःचा बचाव करा.

यापूर्वी लेणी क्रमांक १६ मध्ये मधमाशांचे पोळे होते. विभागाने ते काढून टाकल्याने हल्ल्यांचे प्रमाण थांबले होते. मात्र वर्षभरानंतर आज पुन्हा लेणी क्रमांक १६ व लेणी क्रमांक १० जवळ हल्ला झाल्याने चिंता व्यक्त होत आहे. वेरूळ लेणीतील ३४ लेण्यांपैकी अनेक ठिकाणी आजही आग्या मोहळाचे पोळे आहेत.

१० वर्षांपूर्वी लेणी क्रमांक २९ व १६ मध्ये अशाच मधमाशांच्या हल्ल्यात ५० ते १०० विदेशी पर्यटक जखमी झाले होते. २००७ मध्येही अशीच घटना घडली होती. अलीकडेच अजिंठा लेणीतही दोन महिन्यात ५ वेळा मधमाशांचे हल्ले होऊन ११ पर्यटक जखमी झाले आहेत.

अशा हल्ल्यांपासून बचावासाठी लेणी परिसरातील मधमाशांची पोळी वेळोवेळी तपासून हटवावीत. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी प्रथमोपचार पथक, धूर फवारणी यंत्रणा व सूचना फलक लावावेत, अशी मागणी पर्यटकांनी केली आहे. सध्या उन्हाळ्याच्या सुट्टी मुळे पर्यटकांची संख्या वाढली असून प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

पुरातत्व विभागाचे वेरूळ लेणी प्रमुख अधिकारी निलेश कोळी यांनी सांगितले, ङ्गसध्या उन्हाळा असल्याने मधमाशा येथे पुन्हा पोळी बनवत आहेत. यापूर्वी मधमाशांची पोळी हटवण्यात आली होती, परंतु त्यांनी पुन्हा घरटी बनवली आहेत. तज्ज्ञांच्या मदतीने ही पोळी पुन्हा हटवण्यात येतील. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवण्यात येणार आहेत.

# पं.तानसेन: असा कलावंत हजार वर्षांत झाला नाही

कलाकारांना धर्म नसतो असं म्हणतात. त्यांची कला हाच त्यांचा धर्म असतो, पण काही कलाकारांनी इतिहासात आपली अशी काही छाप सोडली आहे की, त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही आपल्या मनात कुतूहल निर्माण होतं आणि आपण त्याची माहिती शोधून काढतो. बापू- श्रीकृष्णदास निरंकारी यांचा सदर संकलित लेख अवश्यच आपल्या ज्ञानात भर घालेल... संपादक.

अकबराच्या दरबारातील रत्न म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तानसेन बद्दल अशीच एक चकित करणारी माहिती इतिहास अभ्यासकांनी उपलब्ध करून ठेवलेली आहे. नावावरून आणि आजवर ऐकलेल्या कथांवरून तानसेन ही व्यक्ती मुस्लिम धर्मीय असावी, असा बहुतांश लोकांचा अंदाज आहे, पण आपल्या गायन कलेने आणि उर्दूच्या अस्खलित उच्चाराने अकबर राजा आणि दरबाराला प्रभावित करणारा हा गायक हिंदू धर्मात जन्माला आलेला होता, अशी माहिती एका इतिहास अभ्यासकाने लिहून ठेवलेली आहे. तानसेन हे एक श्रेष्ठ भारतीय गायक होत. संगीतक्षेत्रात अलौकिक अशा गणल्या गेलेल्या या कलावंताबद्दल जितके चमत्कार आणि दंतकथा प्रचलित आहेत, त्या म ानाने त्याचे अधिकृत चरित्र असे कोठे नोंदले गेलेले नाही. त्याचे जन्मवर्ष १५०६, १५२६, किंवा १५३१–३२ असेही दर्शविले जाते. तानसेनचे मूळ नाव रामतनू किंवा तन्नामित्र असे होते. ग्वाल्हेरजवळ बेहट या गावी त्याचा जन्म झाला. त्याचे वडील मकरंद पांडे हे गौड ब्राम्हण, संस्कृत पंडित व उत्तम गायक होते. त्यांच्यामुळे त्याला लहान वयातच गाण्याची गोडी लागली. तानसेनची ग्रहणशक्ती पाहून वृंदावनचे संत स्वामी हरिदास यांनी तानसेनला गाणे शिकवले. आरंभी ग्वाल्हेर येथे दरबारात राहिल्यावर आणि गायक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केल्यावर तो रीवा नरेश, रामचंद्र बाघेला यांच्या दरबारांत गायक म्हणून राहिला. तेथून सन १५६२च्या सुमारास तानसेन अकबर बादशाहाच्या दरबारात आले. अकबरच्या दरबारात येण्यापूर्वीच सर्वोत्कृष्ट गायक म्हणून त्यांची ख्याती पसरलेली होती. अकबराने त्यांना विशेष सन्मान देऊन संगीतसम्राट तानसेन म्हणून गौरविले आणि आपल्या दरबारी नवरत्नांमध्ये त्यास स्थान दिले. पुढे तानसेन हे संगीतक्षेत्रातील एक अद्भूत चमत्कार म्हणून ख्याती पावले. तानसेन हे धृपद गायक होते. शिवाय त्यांनी स्वतः रचलेली अनेक धृपदेही प्रसिद्ध आहेत. रागकल्पद्रुम या ग्रंथात तानसेनने रचलेली अनेक धृपदे आढळतात. त्यांनी व्रज भाषेत आपली पद्यरचना केली.

तानसेनचा जन्म इ.स.१५३२मध्ये मध्यप्रदेश मधील बेहट, ग्वाल्हेर येथे एका ब्राम्हण घरात झाला होता. त्याचं खरं नाव रामतनू पांडे असं होतं. त्याच्या वडिलांचं नाव मुकुंदराम पांडे असं होतं. मुकुंदराम पांडे हे एक कवी आणि संगीतकार होते. काही काळ त्यांनी वाराणसीच्या मंदिरात प्रवचनकार म्हणून काम केलं होतं. तानसेनने गाण्याचं शिक्षण आपल्या वडिलांकडून घेतलं होतं. रामतनू हा मुकुंदराम पांडे यांचा एकुलता एक सुपुत्र होता. त्याच्या जन्माची एक कथा आहे. मुकुंद पांडे हे ग्वाल्हेरच्या मोहम्मद गाऊस यांच्या गायकीचे चाहते होते. व्यक्ती म्हणून देखील मुकुंदराम हे मोहम्मद गौस यांचा खूप आदर करायचे. एका भेटीत मुकुंदराम यांनी गौस यांना आपल्याला आपत्य नसल्याची खंत व्यक्त केली होती आणि अशी विनंती केली होती की, ङ्गआपणही आम्हाला मुलगा व्हावा यासाठी देवाकडे प्रार्थना करावी.ङ्घ मोहम्मद गौस यांची प्रार्थना देवाने ऐकली आणि मुकुंदराम यांना मुलगा झाला. मुकुंदराम पांडे तो ५ वर्षांचा झाल्यावर आपल्या मुलाला मोहम्मद गौस यांच्याकडे आशीर्वाद घेण्यासाठी घेऊन आले होते. भेटी दरम्यान, आपल्या मुलाने सुद्धा शास्त्रीय गायक व्हावं अशी इच्छा मुकुंदराम यांनी मोहम्मद गौसकडे व्यक्त केली. मोहम्मद गौस हे तेव्हा विड्याचं पान खात होते. शिष्य म्हणून नेमणूक करण्याच्या हेतूने मोहम्मद गौस यांनी आपल्या तोंडातील लाळ बोटाने काढली आणि ती त्यांनी रामतनू पांडेच्या तोंडामध्ये ठेवली. मोहम्मद गौस यांनी त्या दिवसापासून रामतनू पांडे याचा शिष्य म्हणून स्वीकार केला आणि त्यांनी रामतनूचा आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ केला.

तानसेनला दोन बायका असून सुरतसेन, सरतसेन, सरस्वती ही हिंदू पत्नीची मुले आणि तानरंगखाँ व बिलासखाँ ही हुसेनी नामक मुस्लिम उपपत्नीची मुले असे समजले जाते. सरस्वतीचा विवाह मिश्रीसिंग (नौबतखाँ) नावाच्या बीनकाराबरोबर झाला आणि मुलीकडूनचा त्याचा बीनकारांचा वंश सेनिया म्हणून प्रसिद्धीस आला. मुलाकडूनची सेनिया परंपरा रामपूरची असून हे कलावंत धृपद गायक होते. तानसेनने स्वतः अनेक नवीन रागांची निर्मिती केली असून मियाँ की तोडी, मियाँ की मल्हार, दरबारी कानडा, मियाँ की सारंग वगैरे राग तानसेनची निर्मिती म्हणून मानली जाते. दीपक राग गाऊन अग्नी प्रज्वलित करणे, मल्हार गाऊन पाऊस पाडणे, तोडी गाऊन हरणे बोलावणे, बैजू बावराशी स्पर्धा, तानारिरिचा प्रसंग वगैरे अनेक चमत्कृतीपूर्ण आख्यायिका तानसेनच्या जीवनाशी जोडल्या जातात. सुप्रसिद्ध वैष्णव संत गोविंदस्वामी यांच्या बरोबरच्या आख्यायिकाही प्रचलित आहेत. संत सूरदास आणि पंडित जगन्नाथराम हेदेखील तानसेनच्या सहवासात आले होते, असे मानले जाते. संगीताच्या दृष्टीने तानसेनची धृपद गायकी ही गौडी, गोहरबानी म्हणून समजली जाते. संगीत सार व रागमाला हे दोन ग्रंथ त्याच्या नावांवर दाखवले जातात. अबुल फज्लने अकबरनाम्यात तानसेनाचे वर्णन 'असा कलावंत हजार वर्षांत झाला नाही', असे केले आहे. तानसेनाची समाधी ग्वाल्हेर येथे मुहंमद घौस या अवलियाच्या दर्ग्याजवळ दाखवली जाते. त्या ठिकाणी दर वर्षी तानसेनच्या पुण्यतिथीला मोठा जलसा भरवला जातो व त्यात अनेक नामवंत गायक आपली सेवा रुजू करतात. पं.तानसेन ऊर्फ रामतनु ऊर्फ तन्नामित्र, त्रिलोचन, तनसुख हे अकबराच्या दरबारातील प्रसिद्ध नवरत्नांपैकी एक रत्न होते. पं.तानसेन हे संगीतशास्त्रात निपुण होते. त्यांना मियां तानसेन असे सुद्धा म्हणत. पं.तानसेन यांच्या वडिलांचे नाव मकरंद पांडे होते. त्यांच्याकडेच पं.तानसेन यांनी प्रारंभिक शिक्षण घेतले. सुफी संत गौस मोहंमद यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. संगीतसम्राट पं.तानसेन यांचे देहावसान दि.६ मे १५८९ रोजी झाले.

!! पं.तानसेन पुण्यस्मरण निमित्त त्यांना कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

**– संकलन व शब्दांकन**
**बापू– श्रीकृष्णदास निरंकारी,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

# हिंदूसूर्य महाराणा प्रताप

**महाराणा** प्रताप सिंह हे मेवाड येथील उदयपूर येथील शिशोदिया राजवंशाचे राजा होते. शौर्य आणि वचनबद्धतेचे प्रतीक म्हणून त्यांचे नाव इतिहासात कोरले जाईल. अनेक वर्षे त्यांनी मुघल सम्राट अकबराशी लढा दिला. महाराणा प्रताप सिंग यांनीही मुघलांना अनेक वेळा युद्धात पराभूत केले. त्यांचे वडील, महाराणा उदयसिंग आणि आई, जीवत कंवर, ज्यांचा जन्म राजस्थानमधील कुंबलगड येथे झाला. राणा प्रताप आणि २०,००० राजपूत १५७६ मध्ये हल्दीघाटीच्या लढाईत मुघल नेते राजा मानसिंग यांच्या ८०,००० सैन्याला भेटले.

शत्रूच्या सैन्याने वेढलेल्या महाराणा प्रतापांना झाला मानसिंग यांनी वाचवले आणि त्यांनी महाराणा यांना रणांगण सोडण्याची विनंती केली. शक्तीसिंहाच्या देहाच्या बलिदानामुळे महाराणा वाचला. चेतक, माझा प्रिय घोडा देखील मेला. हा संघर्ष फक्त एक दिवस चालला, परंतु त्यात १७,००० लोकांचा बळी गेला. अकबराने मेवाड जिंकण्यासाठी खूप प्रयत्न केले. महाराणाची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेली. भामा शाह देखील २५,००० राजपूतांना १२ वर्षांचे अनुदान देऊन अमर झाला.

हाराणा प्रताप यांचा जन्म कुंभलगड किल्ल्यात झाला. महाराणा प्रताप यांच्या आई जवंताबाई या पालीच्या सोनगरा अखैराजच्या कन्या होत्या. तारुण्यात महाराणा प्रताप यांना किका या नावाने ओळखले जात होते. महाराणा प्रताप यांचा राज्याभिषेक गोगुंडा येथे झाला. महाराणा प्रताप लहानपणापासूनच शूर, स्वाभिमानी आणि स्वातंत्र्यप्रेमी होते. १५७२ मध्ये मेवाडच्या सिंहासनावर पोहोचताच त्यांना अभूतपूर्व अडथळ्यांचा सामना करावा लागला, परंतु त्यांनी धैर्याने आणि धैर्याने त्यावर मात केली.



हळदी घाटीत त्यांनी मुघल सैन्याविरुद्ध भयंकर युद्ध केले. त्यांनी आपल्या पूर्वसुरींच्या सन्मानाचे आणि प्रतिष्ठेचे रक्षण केले आणि प्रतिज्ञा केली की जोपर्यंत त्यांचे राज्य मुक्त होत नाही तोपर्यंत ते राज्याचे सुख उपभोगणार नाहीत, जे भारतीय इतिहासात अभूतपूर्व आहे. ते जमिनीवर झोपू लागले आणि अरावलीच्या जंगलात भटकंती करू लागला, खूप त्रास सहन करत होता, परंतु त्यांनी मुघल बादशहाची अधीनता स्वीकारण्यास नकार दिला. मातृभूमीच्या रक्षणासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले.

महाराणा प्रताप यांना त्यांच्या वडिलांनी लहानपणी ढाल आणि तलवार कशी हाताळायची हे शिकवले होते, ज्यांनी त्यांना स्वतःसारखा सक्षम योद्धा व्हावा अशी इच्छा होती. प्रताप या लहान मुलाने आधीच आपल्या अतुलनीय शौर्याचे प्रदर्शन केले होते. मुलांसोबत खेळायला गेल्यावर ते या बाबतीत संघ आयोजित करायचे. ते संघातील बाकीच्या मुलांसोबत ढाल तलवारीचा सराव करायचे आणि त्यांचा परिणाम म्हणून ते शस्त्रे चालवण्यात तरबेज झाले. वेळ संथ होता. दिवस महिने झाले आणि महिने वर्ष झाले. दरम्यान, प्रताप शस्त्राने सक्षम झाला आणि उदयसिंग फुले त्यांना रोखण्यास सक्षम नव्हते. महाराणा प्रताप आपल्या वडिलांच्या शेवटच्या विनंतीनुसार, प्रतापने आपला सावत्र भाऊ जगमल याला राजा म्हणून नियुक्त केले, परंतु चुंडावत राजपूत, मेवाडचे विश्वासपात्र, यांनी जगमलची राजवट विनाशकारी असल्याचे मानले आणि जगमलला पदत्याग करण्यास भाग पाडले. जगमल हा मुकुट सोडण्यास तयार नव्हता, म्हणून ते अचूक बदला घेण्यासाठी अजमेरला गेले आणि अकबराच्या सैन्यात सामील झाला, त्या बदल्यात जहाजपूरची जहागीर मिळाली. या काळात राजकुमार प्रताप हे मेवाडचे ५४ वे शासक बनले आणि त्यांना महाराणा ही पदवी देण्यात आली. महाराणा प्रतापच्या कारकिर्दीत, अकबराने दिल्लीवर राज्य केले आणि अकबराचे ध्येय दुर्सया हिंदू राजाला वश करण्यासाठी हिंदू राजांच्या शक्तीचा वापर करणे हे होते. राजकुमार प्रताप १५६७ मध्ये उत्तराधिकारी बनले तेव्हा अवघे २७ वर्षांचे होते आणि मुघल सैन्याने चित्तोडला चारही बाजूंनी वेढा घातला. महाराणा प्रताप यांचा पराक्रमाचा आदर्श इतरांपेक्षा वेगळा आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत ते लढले, तरीही त्यांनी शरणागती पत्करली नाही. भारतीय इतिहासात राजपूतांच्या उदयाचे श्रेय राणा प्रताप यांनाच आहे. ते आपल्या मातृभूम ीला गुलाम किंवा कलंकित होऊ देणार नाही. त्यांनी मोठ्या मुघल सैन्याला लोखंडी हरभरे खायला लावले. मुघल सम्राट अकबराने राणा प्रतापचा देश ताब्यात घेऊन आपल्या साम्राज्यात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला, परंतु राणा प्रतापने नकार दिला आणि आपल्या प्राणाची बाजी लावली. महाराणी जयवंता व्यतिरिक्त, राणा उदयसिंग यांच्या अनेक बायका होत्या, त्यापैकी सर्वात प्रिय राणी धीरबाई होत्या. राणी धीरबाईने आपला मुलगा जगमल याला राणा उदयसिंगच्या उत्तराधिकारी बनवायचे ठरवले.

राणा उदय सिंह यांना या व्यतिरिक्त शक्ती सिंह आणि सागर सिंह ही दोन मुले होती. राणा उदयसिंग नंतर सिंहासनावर दावा करण्याची योजना देखील होती, परंतु प्रजा आणि राणा जी दोघांनीही प्रतापला योग्य वारस म्हणून पाहिले. याच कारणामुळे प्रतापला या तिन्ही भावांनी तुच्छ लेखले.

महाराणी जयवंता व्यतिरिक्त, राणा उदयसिंग यांच्या अनेक बायका होत्या, त्यापैकी सर्वात प्रिय राणी धीरबाई होत्या. राणी धीरबाईने आपला मुलगा जगमल याला राणा उदयसिंगच्या उत्तराधिकारी बनवायचे ठरवले. राणा उदय सिंह यांना या व्यतिरिक्त शक्ती सिंह आणि सागर सिंह ही दोन मुले होती. राणा उदयसिंग नंतर सिंहासनावर दावा करण्याची योजना देखील होती, परंतु प्रजा आणि राणा जी दोघांनीही प्रतापला योग्य वारस म्हणून पाहिले. याच कारणामुळे प्रतापला या तिन्ही भावांनी तुच्छ लेखले.

महाराणा प्रताप साडेसात फ्फूट उंच आणि ११० किलोग्रॅम वजनाचे होते. त्यांच्या बचावात्मक ढालचे वजन ७२ किलोग्रॅम होते आणि त्यांच्या भाल्याचे वजन ८० किलोग्रॅम होते. ते २०० किलोपेक्षा जास्त चिलखत, भाला, ढाल, तलवार यासह इतर गोष्टींसह युद्धात भाग घेत असत. उदयपूर राजघराण्याच्या संग्रहालयात महाराणा प्रताप यांचे चिलखत, तलवार आणि इतर सामान आजही सुरक्षित ठेवण्यात आले आहे.

महाराणा प्रताप यांची हल्दीघाटीची लढाई

हल्दीघाटीची लढाई ही भारतीय इतिहासातील एक महत्त्वाची घटना आहे. हे युद्ध १८ जून १५७६ रोजी सुमारे ४ तास चालले आणि मेवाड आणि मुघल यांच्यातील हिंसक लढाई दर्शविली. महाराणा प्रताप यांच्या सैन्याचे नेतृत्व एकल मुस्लिम सरदार हकीम खान सुरी करत होते, तर मानसिंग आणि असफ्फ खान यांनी मुघल सैन्याचे नेतृत्व केले होते. या लढ्याने महारण प्रतापच्या २०,००० राजपूतांना अकबराच्या ८०,००० बलवान मुघल सैन्याविरुद्ध उभे केले, जे अभूतपूर्व होते. महाराणा प्रताप यांनी अनेक संकट/संकट असतानाही हार मानली नाही आणि आपले शौर्य दाखवून दिले, म्हणूनच त्यांचे नाव आज इतिहासात स्मरणात आहे. काही इतिहासकारांचे मत आहे की हल्दीघाटीची लढाई कोणीही जिंकली नाही, जरी पुरावे दाखवतात की फ्फक्त महाराणा प्रताप जिंकले. महाराणा प्रतापच्या सैन्याने, आकाराने लहान असूनही, अकबराच्या प्रचंड सैन्याचे षटकार सोडले आणि त्यांच्या कठोर परिश्रम आणि चिकाटीमुळे त्यांना मागे हटण्यास भाग पाडले.

महाराणा प्रताप यांचा चेतक घोडा- महाराणा प्रताप यांच्या शौर्याबरोबरच त्यांच्या चेतक या घोड्याचे धाडसही पौराणिक आहे. चेतक हा एक धाडसी आणि हुशार घोडा होता ज्याने आपला जीव धोक्यात घालून २६ फ्फूट खोल नदीतून उडी मारून महाराणा प्रताप यांना वाचवले होते. हल्दीघाटी येथे चेतकचे मंदिर आजही उभे आहे. अनेक राजस्थानी घराणी अकबराच्या प्रभावाला बळी पडली होती, परंतु महाराणा प्रताप यांनी आपला वंश जिवंत ठेवण्यासाठी संघर्ष केला आणि अकबराच्या अधीन होण्यास नकार दिला. गवत आणि गवताच्या कुरणात, मी जंगलातून जंगलात फ्फिरलो. आपल्या पत्नी आणि मुलासह भयंकर परिस्थितीत राहूनही त्यांनी सहनशीलता गमावली नाही. दानवीर भामाशाह यांनी आपली संपूर्ण संपत्ती निधीच्या कमतरतेमुळे सैन्याचे घसरत चाललेले मनोबल पुनर्संचयित करण्यासाठी समर्पित केली. तरीही, महाराणा प्रताप म्हणाले, ङ्गमला तुमच्या खजिन्यातील एक रुपयाही नको आहे, सैन्याच्या मागण्यांशिवाय.ङ्घ अकबराच्या म्हणण्यानुसार, महाराणा प्रताप यांच्याकडे काही संसाधने होती, परंतु ते खाली वाकले नाहीत आणि घाबरले नाहीत. महाराणा प्रताप यांनी आपला वेळ हल्दीघाटीच्या लढाईनंतर डोंगर आणि जंगलात घालवला. त्यांच्या पर्वतीय युद्धाच्या रणनीतीद्वारे त्यांनी अकबराचा अनेक वेळा पराभव केला. जंगलात आणि डोंगरात राहताना असंख्य अडचणींचा सामना करूनही महाराणा प्रताप यांनी आपली श्रद्धा सोडली नाही. अकबराच्या सेनापतींचे सर्व प्रयत्न महाराणा प्रतापच्या दृढ हेतूने पराभूत झाले.

३० वर्षे सतत प्रयत्न करूनही अकबर महाराणा प्रतापांना कैद करू शकला नाही. हे त्यांच्या धैर्य आणि धैर्यामुळे होते. चेतक, महाराणा प्रताप यांचा आवडता घोडा, शेवटच्या श्वासापर्यंत त्यांच्या मालकाच्या पाठीशी उभा होता.जंगलात झालेल्या अपघातामुळे महाराणा प्रताप जखमी होतात. १९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापने प्राणत्याग केला. यावेळेपर्यंत त्यांचे वय अवघे ५७ वर्षे होते. आजही राजस्थानमध्ये त्यांच्या स्मरणार्थ उत्सव होतात. त्यांच्या समाधीला लोक श्रद्धांजली अर्पण करतात. महाराणा प्रतापच्या शौर्याने अकबरही प्रभावित झाला. अकबराने प्रताप आणि त्याच्या प्रजेकडे आदराने पाहिले. त्यामुळे हल्दीघाटीच्या लढाईत आपल्या सैन्यात हुतात्मा झालेल्या सैनिकांना आणि सामंतांना हिंदू रीतिरिवाजानुसार श्रद्धेने अंतिम निरोप देण्यात आला.

# महाराष्ट्र राज्य स्थापना वर्धापन दिन उत्साहात; सर्वांच्या सहभागातून प्रगतीची वाटचाल - पालकमंत्री संजय शिरसाट



छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

महाराष्ट्राला प्रगतीची परंपरा आहे. ही संतांची भुमि आहे. आपला जिल्हा हा गुंतवणूकदारांसाठी नेहमीच पहिली पसंती ठरला असुन जिल्ह्याची औद्योगिक वाढ लक्षणीय आहे. रोजगाराच्या अनेक संधी याठिकाणी निर्माण होत आहेत. सर्व घटकांच्या सहभागामुळे ही प्रगतीची वाटचाल होत आहे,असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापन दिन आज उत्साहात साजरा झाला. देवगिरी या पोलीस कवायत मैदानावर मुख्य शासकीय सोहळा पार पडला. पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते मुख्य शासकीय सोहळ्यात ध्वजारोहण करण्यात आले.

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्रचे विशेष महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, नगरसेवक हर्षदा शिरसाट, किशोर नागरे तसेच अन्य अधिकारी, माजी खासदार चंद्रकांत खैरे तसेच स्वातंत्र्य सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन राष्ट्रगीत झाले. राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. त्यानंतर पोलीस वाद्यवृंदाच्या तालावर शानदार संचलनाने उपस्थितांची मने जिंकली. पालकमंत्री शिरसाट यांनी परेडचे निरीक्षण केले. झालेल्या संचलनात होमगार्ड, बँड पथक, शहर वाहतूक शाखा ,महाराष्ट्र सुरक्षा बल, पोलीस आयुक्तालय आणि छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पथकांनी सहभाग घेतला.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, आपला जिल्हा हा गुंतवणूकदारांची प्रथम पसंती ठरत आहे. जिल्ह्यात होत असलेल्या औद्योगिक विकासात कामगार वर्गाचे मोठे योगदान आहे. जिल्ह्यातील आरोग्य सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, नागरी सुविधांचा विकास करण्यासाठी होत असलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी आपल्या भाषणातून दिली.

ते म्हणाले की, जिल्ह्यात विविध प्रशासकिय सुधारणांमुळे प्रलंबितता कमी होऊन सामान्य नागरिकांना सेवा देण्यातही आपला जिल्हा अग्रेसर ठरला आहे, त्याबद्दल पालकमंत्री शिरसाट यांनी प्रशासकीय यंत्रणेचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, समाजातील सर्व घटकांच्या सहयोगातून आपल्याला जिल्ह्याचा विकास करावयाचा आहे. राज्याचा प्रगतीचा वारसा पुढे न्यायचा आहे, त्यासाठी सगळ्यांनी योगदान द्यावे,असे आवाहन त्यांनी केले. सर्वांच्या हिताच्या योजनांच्या अंमलबजावण्यासाठी निधी उपलब्ध केल जात आहे, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. आपण सर्वजण यात योगदान देऊ; जिल्ह्याचे नाव प्रगतीपथावर नेऊ,असा संकल्प आज महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सर्व मिळून करू, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले.

जनगणनेत सहभागाचे आवाहन

देशात जनगणना सुरु होत आहे. त्याचा पहिला टप्पा आजपासून (दि.१ मे) स्वगणना सुरु होत आहे. त्यासाठी नागरिकांनी ऑनलाईन आपली माहिती भरावी. जनगणनेत माहिती द्यावी. ही माहिती गोपनीय असते. या माहितीचा उपयोग करुन देशाच्या, राज्याच्या कल्याणाच्या योजना, धोरणे आखली जातात. जनगणनेत सहभाग नोंदवावा. आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकाला माहिती द्या,असे आवाहन यावेळी पालकमंत्री शिरसाट यांनी केले.

पुरस्कार वितरण

याप्रसंगी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तिंचा सन्मान पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आला. त्यात १५० दिवसाच्या कृती आराखड्या अंतर्गत सेवाकर्मी प्लस कार्यक्रमात जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरने प्रथम क्रमांक मिळिवला त्याबद्दल जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, महिला व बालकल्याण क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल अश्विनी लखमले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्राप्त कविता वाघ यांना सन्मानीत करण्यात आले. उत्कृष्ट काम गीरीबद्दल पोलीस उपनिरीक्षक श्रीमती प्रविणा यादव , सहाय्यक पोलीस आयुक्त आनंद गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद अविनाश बागुल, दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस हवलदार ओमप्रकाश बनकर आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस हवालदार दीपक इंगळे व देवीसिंग ठाकूर यांना सन्मानित करण्यात आले.

सोहळा संपन्न झाल्यावर पालकमंत्री संजय शिरसाट यांनी कार्यक्रमास उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, पदाधिकारी, नागरिक, अधिकारी यांना भेटून शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन प्रवीण कन्नडकर यांनी केले.

## महाराष्ट्र दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रताप काळे, अतिरिक्त आयुक्त खुशालसिंह परदेशी, अतिरिक्त आयुक्त मंजुषा मिसकर, अतिरिक्त आयुक्त रिता मैत्रेवार, अतिरिक्त आयुक्त (आस्थापना) दादासाहेब वानखेडे, उपायुक्त विजय पवार, सहायक आयुक्त सरीता सुत्रावे, सहायक आयुक्त शुभांगी आंधळे, सहायक आयुक्त डॉ. ज्ञानोबा मोकाटे, सह महानगर नियोजनकार हर्षद बाविस्कर, सह महानगर नियोजनकार रवींद्र जायभाये , सह आयुक्त प्रशासन अंजली धानोरकर, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी साधना बांगर, जिल्हा कृषी अधिकारी वैशाली कुलकर्णी व तहसीलदार अरुण पावडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विभागीय माहिती कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय आणि माहिती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त सहायक संचालक गणेश फुंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सर्वांनी राष्ट्रीय ध्वजास सलामी देऊन राष्ट्रगीत म्हटले. याप्रसंगी उपसंपादक रेखा पालवे, सहायक अधीक्षक प्रविण भानेगावकर, प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी आदींसह विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, माहिती केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिन; जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वर्धापनदिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस दलाने राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.

अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकूणे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगीता राठोड, उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) संगीता सानप, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रुपेश शिंगारे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, अपर तहसीलदार उमेश पाटील, तहसीलदार पल्लवी लिगदे, रूपा चित्रक यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी उपस्थित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना भेटून शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त विविध क्षेत्रातील १०१ उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, टी.व्ही. सेंटर येथे विराट फाऊंडेशन, महामाया आधार सेवाभावी संस्था तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त विविध क्षेत्रातील १०१ उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींचा भव्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रविंद्र ब. जोगदंड (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी), अँड. दिपक भिंगारदेव, डॉ. जीवन राजपूत (प्रसिद्ध न्युरोसर्जन), प्राचार्य. सुनिल वाकेकर, लक्ष्मणदादा भुतकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. या कार्यक्रमाचे आयोजन विराट फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष संपादक फिरोज शेख, डॉ बाबासाहेब आंबेडकर कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, वसंतराज वक्ते, महामाया आधार सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष राजकुमार कांबळे इत्यादी ने केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजल कांबळे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन वसंतराज वक्ते यांनी केले. संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



# पत्रकारितेचा खरा धर्म: सडेतोड लेखन आणि सत्याची मांडणी – एस. के. बावस्कर







**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

रतन कुमार साळवे, संपादक दैनिक निळे प्रतीक तथा अध्यक्ष, एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशन यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम अट्टलमत कार्यालयाच्या प्रांगणात शनिवारी संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सेवानिवृत्त जिल्हा माहिती अधिकारी एस. के. बावस्कर यांनी पत्रकारितेच्या भूमिकेवर स्पष्ट आणि ठाम मत मांडले.

ते म्हणाले की, ङ्गपत्रकारांनी सडेतोड लेखन करावे, जनतेला आरसा दाखवावा आणि निर्भीडपणे सत्य मांडावे, हीच खरी पत्रकारिता आहे.ङ्घ आजच्या काळात पत्रकारितेची व्याख्या बदलत चालली असल्याचे ते नमूद करत म्हणाले की, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आता प्रत्येक सामान्य नागरिकाच्या हातात मोबाईल आला आहे. त्यामुळे प्रत्येक जण आपल्या परीने पत्रकाराची भूमिका पार पाडत आहे. कोणतीही घटना काही क्षणात कॅमेऱ्यात कैद होते आणि एका मिनिटात जगभर पोहोचते. ते पुढे म्हणाले की, जग अत्यंत वेगाने बदलत आहे. अशा परिस्थितीत देशात नवक्रांती आणि विकास घडवून आणायचा असेल, तर पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. समाजातील घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून वस्तुनिष्ठ आणि सत्य माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे ही पत्रकारांची जबाबदारी आहे.

कार्यक्रमादरम्यान केक कापून रतनकुमार साळवे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष रशपालसिंग अट्टल, वरिष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे, संपादक सुरेश शिरसागर, बाजीराव सोनवणे, नितीन दांडगे, नदीम सौदागर, बबनराव सोनवणे, भीमराव गाडेकर तसेच शेख फिरोज, डॉ. दिवेकर, अॅड. सिद्धार्थ सोनवणे, फिरोज खान पठाण, अब्दुल बारी, यश सोनवणे आदी पत्रकार उपस्थित होते. उपस्थितांनी साळवे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# महावितरणमध्ये गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार सोहळा थाटात

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील ४१ तंत्रज्ञ, यंत्रचालकांचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात शुक्रवारी (१ मे) महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

कामगार दिनानिमित्त वर्षभरात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तंत्रज्ञ व यंत्रचालक संवर्गातील ४१ कर्मचाऱ्यांना गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्काराने गौरवण्यात आले. चिकलठाणा एमआयडीसीतील 'मसिआ'च्या श्रीमती रत्नप्रभा बाळासाहेब पवार सभागृहात झालेल्या समारंभात छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील संदीप कानगुळकर, भगवान सहाने, प्रमोद वाघमारे, गणेश बढे, एजाज शेख, दिनेश पोफळे, ईश्वर बंदिवान, मनीषा नाईकवाडे, परमेश्वर खरात, हरिश्चंद्र तुपे, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील सोमीनाथ परांडे, राजेश कोकणे, दीपक वाघ, मंगेश धानोकर, दिनेश दुधवने, मधुकर सहाणे, आतिश नाडे, पांडुरंग धांडे, महेश



सूर्यवंशी, किरण मोरे, किशोर ठेंगडे, सुभाष चव्हाण, सचिन दुम्पलवार, अक्षय वाघ, अनिल कडे, रामहरी येल्लुपिल्ले, शालिकराम आहेर, सचिन डुबे, गणेश चौधरी तर जालना मंडलातील शिवदास काळे, पद्माकर ठोंबरे, सीताराम राठोड, रविंद्र पवार, सुनील दाभाडे, संतोष सपकाळ, मनोहर माहुरे, सुदाम सोळुंके, अंकुश कागदे, नामदेव सावंत, कृष्णा निकम, अमोल सोळंके या कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आले.

गतवर्षीप्रमाणेच यंदाही गुणवंत कामगारांचे कौतुक बघण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांनाही विशेष निमंत्रित करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी आपले आईवडील, पत्नी, मुलांसह हा पुरस्कार स्वीकारला. कामगारांना गौरवताना त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. तसेच पुरस्कारार्थींना सेवानिवृत्त होईपर्यंत गणवेशावर लावण्यासाठी 'गुणवंत कामगार – २०२६' अशी नेमप्लेटही देण्यात आली.

कार्यक्रमात सुरुवातीला एशियन हॉस्पिटलचे डॉ.देवराव ठेंगे यांनी 'हृदयरोग कसा टाळावा' यावर तर डॉ.अविनाश त्रिभुवन यांनी 'सीपीआर' या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. मेडिकव्हर रुग्णालयाचे डॉ.विशाल कुटे हेही उपस्थित होते. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) म्हणाले की, तांत्रिक कामगार अहोरात्र कर्तव्य बजावतात. ग्राहकांना अखंड वीजपुरवठ्यासाठी ते परिश्रम घेतात. मात्र अनेकदा कळत-नकळत त्यांना विद्युत अपघात होतात. ते टाळण्यासाठी आपण प्रतिबंधात्मक उपाययोजना करतो. या जोखमीच्या क्षेत्रातही सर्व तांत्रिक कामगार उत्कृष्ट कामगिरी बजावतात, ही अभिमानास्पद बाब आहे. हृदयक्रिया बंद पडल्यावर किंवा अपघात घडल्यावर प्रथमोपचार कसे करावे, याबाबत डॉ.ठेंगे व डॉ.त्रिभुवन यांनी जे मार्गदर्शन केले, ते तुमच्यापर्यंत मर्यादित न ठेवता आपल्या सर्व सहकाऱ्यांपर्यंत पोचवा. कार्यकारी अभियंत्यांनीही आपल्या विभाग पातळीवर असे उपक्रम राबवायला हवे. जेव्हा अपघात होतो, तेव्हा घाबरून न जाता परिस्थिती नीट हाताळली तर जीव वाचू शकतो. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट म्हणाले की, जनमित्र हाच महावितरणचा चेहरा आहे. त्यांच्यामुळेच कंपनीची भरभराट होतेय. गुणवंत कामगारांची जबाबदारी या पुरस्कारामुळे आणखी वाढली आहे. कामात आपण कुठेच कमी नाही. पण कंपनी चालवायची असेल तर आर्थिक परिस्थिती सुधारल्याशिवाय आणि वीजगळती कमी केल्याशिवाय तरणोपाय नाही. अनधिकृत वीजवापरावर कारवाई आणि वापरलेल्या विजेच्या प्रत्येक युनिटची वसुली ही दोन महत्त्वाची कामे करावी लागतील, असे मुख्य अभियंता कछोट यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्वांना सुरक्षा शपथ देण्यात आली. वर्षभरात कर्तव्य बजावताना मृत्युमुखी पडलेल्या महावितरण कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, संदीप दरवडे, बीना सावंत, प्रभारी सहायक महाव्यवस्थापक शंकर कुलकर्णी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, गिरीश गायकवाड, प्रसाद महातोले, महेंद्र देशमुख, शैलेश कलंत्री, रमेश वाघचौरे, अविनाश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. व्यवस्थापक डॉ. शिवाजी तिकांडे यांनी सूत्रसंचालन केले. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी आभार मानले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199